जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति



(Since 1969) www.jainjagruti.in

६२ ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड,
सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.
मो. : ८२६२०५६४८०
मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१
❖ संस्थापक ❖
स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया
संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया
सहसंपादक : सौ. सुनंदा एस. चोरडिया

❖ वर्ष ५७ वे ❖ अंक १ ला ❖ सप्टेंबर २०२५ ❖ वीर संवत २५५१ ❖ विक्रम संवत २०८१

या अंकात

| | पान नं. |
|---|---|
| ● जैन जागृति मासिकाचे ५७ व्या वर्षात पदार्पण | २३ |
| ● जैन समाजाने आंदोलन करतांना सर्व बाजूने विचार करावा | २७ |
| ● जैन जागृति, चोरडिया परिवार – सन्मान | २८ |
| ● पर्युषण पर्वाराधना इस प्रकार करें | २९ |
| ● दस लक्षण महापर्व | ३१ |
| ● कव्हर तपशील | ३२ |
| ● समभावी साधक – गजकुमार | ४३ |
| ● सुख और शांति | ५३ |
| ● आओ ! दुर्ध्यान छोडे | ६७ |
| ● आचार्य सम्राट पूज्य श्री आनंदऋषिजी म.सा. | ७५ |
| ● मंत्राधिराज प्रवचनसार | ७९ |
| ● दीपावली पूजन विधी | ९१ |
| ● दीपावली मुहूर्त | ९५ |
| ● कुशलता बढाएँ, सफलता पाएँ | ९७ |
| ● समाज की विकृतियों का निवारण कैसे ? | १०१ |
| ● बैंक बॅलेन्स – Locker | १०६ |
| ● कालचक्र – Time Cycle | ११५ |
| ● पारंपारिक व्यवसायाला नव्या विचारांची आणि आधुनिक तंत्रज्ञानाची गरज | १२३ |
| ● मरणोत्तर नेत्रदान – समज गैरसमज | १२६ |
| ● खुद को जितने वाला जगत को जीत लेगा | १२८ |
| ● पैसे नहीं, समय दिजीए | १२९ |
| ● बिने जाने कित जाऊँ – प्रश्नोत्तरी प्रवचन | १३९ |
| ● आइऐ, सुनना सीखें | १४३ |
| ● पर्युषण पर्व – जागृती जैन तत्त्वाची | १४७ |
| ● लोकाभिमुख – प्रसिद्धीविन्मुख इंजिनिअर | १४९ |
| ● जीवन की सार्थकता के पाँच सुत्र | १५२ |
| ● समझौता ही जीवन है | १५३ |
| ● अंतर्चेतना जगाने का उत्सव : पर्युषण | १६३ |
| ● सुविचार | १६४ |
| ● प्रमाद से पतन | १६५ |
| ● आत्मघाती होते है : पाप | १६७ |
| ● तीन प्रकार के मनोरथ | १६८ |
| ● समाज को सदा सुखी रहना हो तो | १६९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ● जैन दर्शन : आधुनिक युग के लिए शाश्वत और वैश्विक जीवन दृष्टी | १७१ | ● नीलकंठ ज्वेलर्स, पुणे – पुरस्कार | २०७ |
| ● हास्य जागृती | १७३ | ● राजस्थान फौंडेशन, पुणे विभाग | २०८ |
| ● प्रेरणादायी वाटचाल | १७५ | ● आनंद दरबार, कात्रज – पुणे | २०९ |
| ● धर्माच्या कॉलम मध्ये जैन लिहा | १७८ | ● सुहाना फिरती विज्ञान प्रयोगशाळा | २११ |
| ● शाकाहारी ही है मानव का उत्तम आहार | १८७ | ● Religous Raaga Share Book | २१२ |
| ● पासवर्ड – Passward | १८९ | ● सौ. सज्जनबाई नेमीचंदजी भंडारी, अन्नदान | २१२ |
| ● वैराग्यवाणी | १९१ | ● आदित्य पितळे, Ph.D. | २१३ |
| ● मला समजलेले विवेकानंद | १९९ | ● आनंदऋषिजी हॉस्पिटल, अहिल्यानगर | २१५ |
| ● विवाह एक भीषण परिस्थिती | १९९ | ● सूर्यदत्त ग्रुप, पुणे – पुरस्कार | २१७ |
| ● करुणाभरी कामना | २०० | ● श्री. राहुलजी छाजेड, पुणे – पुरस्कार | २१९ |
| ● कबुतरांना अनियंत्रित दाणे टाकणे टाळावेत | २०३ | ● आनंद पर्यावरण कट्टा, पुणे | २२० |
| ● स्वानंद महिला संस्था, पुणे | २०४ | ● रेखाताई चोपडा, धारगांव – सन्मान | २२१ |
| ● उवसग्गहरं स्तोत्र : सामुहिक जाप | २०५ | ● वाचकांचे मनोगत | २२३ |
| ● रुबी हॉल क्लिनिक – जैन किचन | २०७ | ● रत्न संदेश | २२५ |
| | | ● सुरक्षा | २२६ |
| | | ● विविध धार्मिक, सामाजिक बातम्या | |


जैन जागृति – ''मॅगझिन पोस्ट'' सुविधेसह वर्गणीचे दर (महाराष्ट्र साठी)

✲ वार्षिक वर्गणी – रु. ८०० ✲ त्रिवार्षिक वर्गणी – रु. २३००

जैन जागृति – ''मॅगझिन पोस्ट'' सुविधेसह वर्गणीचे दर (महाराष्ट्र बाहेर)

✲ वार्षिक वर्गणी – रु. ९०० ✲ त्रिवार्षिक वर्गणी – रु. २६००

मॅगझिन पोस्ट या सुविधेमुळे प्रत्येक ग्राहकांना १००% अंक ३ ते ४ दिवसात मिळणार.

या अंकाची किंमत ५० रु. ● Google Pay - M. 9822086997



'जैन जागृति' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक एस. के. चोरडिया यांनी प्रकाश ऑफसेट, शॉप नं. १२-१३, पर्वती टॉवर्स, पुणे - ४११००९ येथे छापून ६२ बी, ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, पुणे - ४११ ०३७ येथे प्रसिध्द केले. संपादक - एस. के. चोरडिया

"Jain Jagruti" monthly magazine is owned, printed & published by S. K. Chordia, Printed at Prakash Offset, Shop No. 12-13, Parvati Towers, Pune 411009. Published at 62-B, Ruturaj Society, Pune - Satara Road, Pune - 411 037. Editor - S. K. Chordia



टिप : या अंकात प्रसिध्द झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. जैन जागृति संबंधित कोणत्याही कायदेशीर कारवाईसाठी पुणे न्यायलय क्षेत्र ग्राह्य धरले जाईल.

# जैन जागृति
## ५७ व्या वर्षात पदार्पण...



**जैन जागृतिचे संस्थापक**
**स्व. श्री. कांतीलालजी फुलचंदजी चोरडिया**





**संपादक व प्रकाशक**
**संजय चोरडिया** **सौ. सुनंदा चोरडिया**

सप्टेंबर २०२५ - पर्युषण अंका बरोबर गेली ५६ वर्षे ध्येयनिष्ठ, व्यासंगी आणि विवेकी पत्रकारितेची कास धरुन समाजोन्नतीचा वसा घेतलेले ''जैन जागृति'' ५७ व्या वर्षात पदार्पण करीत आहे.

वीतराग प्रभू व गुरु भगवंताचे आशिर्वाद, वर्गणीदार, जाहिरातदार, लेखक, पत्रप्रचारक, ऑफिस स्टॉफ, प्रिंटींग प्रेस, बायंडर, पोस्ट ऑफीस आणि हितचिंतक यांच्या सहयोगाने व सहकार्या मुळेच जैन जागृतिने ५६ वर्षे आपली यशस्वी वाटचाल पूर्ण केली आहे. या सर्वांचे खूप खूप आभार. धन्यवाद !

पुणे शहरातून गेली ५६ वर्षे दरमहा नियमितपणे प्रकाशित होणारे 'जैन जागृति' मासिकाची सुरुवात १५ ऑगस्ट १९६९ रोजी स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया यांनी केली. त्याकाळी मासिके व वर्तमान पत्रामधून जैन समाजाची फार थोडी माहिती प्रसिद्ध होत होती. त्यातही जैन धर्माबद्दल, समाजाबद्दल चूकीची माहिती येत असे. सर्वांना जैन धर्माची खरी ओळख व्हावी, जैन इतिहास, जैन कथा साहित्य, दीपावली जैन विधी, जैन तीर्थक्षेत्र इ. माहिती सर्वांना व्हावी या उद्देशाने 'जैन जागृति' मासिक सुरु केले.

श्री. कांतीलालजी यांच्या निधनानंतर गेल्या २६ वर्षापासून 'जैन जागृति' मासिकाची धुरा संजय चोरडिया व सौ. सुनंदा चोरडिया सांभाळत आहे. 'जैन जागृति'चा मुळ गाभा तसाच ठेवून, त्यात नवीन विचाराची, आधुनिकतेची भर घालून मासिक प्रकाशनात उच्च शिखर गाठत आहे.

### धर्म, सुसंस्कार व सदाचाराला प्रोत्साहन देणारे साहित्य

जैन जागृति मासिकात दरमहा धार्मिक, सामाजिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, कौटुंबिक इ. सर्व स्पर्शी लेख प्रसिध्द होतात. यातून सुसंस्कार व सदाचार यांना प्रोत्साहन देवून समाजाचे नैतीक स्तर वाढवण्याचे कार्य केले जात आहे.

जैन समाजात अनेक मासिके, साप्ताहिके प्रसिध्द होतात. या पैकी काही मासिकात, साप्ताहिक मध्ये फक्त जाहिराती व ठरावीक बातम्या प्रसिध्द केल्या जातात. त्यात धार्मिकता दिसत नाही.

जैन जागृतित दरमहा धर्म, सुसंस्कार व सदाचाराला प्रोत्साहन देणारे अनेक लेखां बरोबर समाजातील विविध बातम्यांना योग्य स्थान दिले जाते.

**एक संप्रदाय, एक संस्थे पुरते मर्यादित नाही मासिकात सर्वांना स्थान**

जैन जागृति एक संप्रदाय किंवा एक संस्था पुरते मर्यादित नाही. समाजातील सर्व संप्रदाय, उप संप्रदाय यांना समान व्यासपीठ दिले जाते. जैन जागृतित सर्व संप्रदायाचे आचार्य, साधु-साध्वी यांचे लेख व बातम्या प्रसिध्द केल्या जातात. तसेच समाजात कार्यरत सर्व संस्थांच्या बातम्या यांना योग्य स्थान दिले जाते. जैन समाजातील महत्त्वाच्या घडामोडी जैन जागृति मुळे समाजाला समजतात.

**धर्म जागृति व जैनत्वाचा अभिमान**

जीवनात सुख, शांती आणि समाधान देणारे वाङ्मय प्रत्येक अंकात असते. या सर्व कारणांनी हे मासिक सर्व समाजाला आपलेसे वाटते. जैन इतिहास, जैनांची थोर परंपरा, कथा साहित्य, धार्मिक व सामाजिक कार्याची माहिती समाज बांधवां पर्यंत पोहोचवणे व जैन बांधवात धर्म जागृति, जैनत्वाचा अभिमान निर्माण करणे हे कार्य जैन जागृति मासिक यशस्वीपणे गत ५६ वर्ष करत आहे.

**भारत सरकार जनगणना धर्माच्या कॉलममध्ये जैन लिहा**

भारत सरकार दर दहा वर्षांनी जनगणना करते. सन २०२१ मध्ये जनगणना होणार होती. कोवीड मुळे जनगणना करण्यास उशीर झाला आहे. २०२५ मध्ये जनगणना कामास सुरवात झाली आहे. भारत सरकार जनगणनेत जैन धर्मियांची लोकसंख्या फार कमी येत आहे. सन २०११ साली जैनांची फक्त ४५ लाख लोकसंख्या आली आहे. जैन बांधवांना या दृष्टीने जागृत करण्यासाठी जैन जागृतिच्या अंकात लेख, बातम्या, निवेदन प्रसिध्द केले आहे. धर्माच्या कॉलम मध्ये जैन लिहा याचे निवेदन दरमहा अनेक वर्षापासून अंकात दिले जाते.

''भारत सरकार जनगणना जैन बांधव जागृति अभियान'' एक पानी निवेदन दरमहा दिले जात आहे व हे निवेदन प्रसिध्द करण्यासाठी विविध मासिक, वर्तमानपत्रे यांना पाठवले आहे. याचा सर्वांनी प्रचार करावा.

**जैन विधीचा प्रचार**

जैन बांधवांनी दीपावली पूजा, वास्तुशांती, भूमिपूजन, लग्न इ. विधी जैन धर्मा प्रमाणे कराव्या या संदर्भात लेख, बातम्या दिल्या. जैन जागृति मध्ये दीपावली पूजनाची विधी व दीपावली पूजनाचे मुहूर्त दरवर्षी दिली जाते. आज भारतात व परदेशात जास्तीत जास्त जैन समाज जैन जागृति मासिक समोर ठेवून दीपावली पूजा करतात.

**५६ व्या वर्षात १६५४ पाने प्रकाशित**

जैन जागृति मासिकाने ५६ व्या वर्षाच्या (सप्टेंबर २०२४ ते ऑगस्ट २०२५ - ११ अंकात) काळात १६५४ पानांचा मजकूर प्रकाशित केला आहे.

**जैन जागृति ''न्यूज बुलेटीन'' प्रकाशन**

मासिक प्रकाशन सोबत मार्च २०२२ पासून जैन जागृति ''न्यूज बुलेटीन'' प्रकाशन सुरु केले आहे. समाजात होणाऱ्या धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे न्यूज बुलेटीन तयार करुन ते ऑनलाईन आमचे ग्राहकांना व्हॉटसअॅप वर व सुमारे १०० ग्रुप वर ऑनलाईन पाठवले जात आहे. समाज बांधवां कडून ''न्यूज बुलेटीन''चे स्वागत करण्यात आले आहे. विविध, धार्मिक, सामाजिक कार्यक्रमाचे जैन जागृति ''न्यूज बुलेटीन'' ऑनलाईन प्रकाशन करण्यासाठी संपर्क साधावा. मो. ९८२२०८६९९७.

**भारत सरकार पोस्ट खाते नवीन ॲक्ट**
**मासिकांची पोस्ट सवलत बंद**
**मासिकांसाठी ''मॅगझिन पोस्ट'' सेवा सुरु**

भारत सरकार मिनीस्टर ऑफ कम्युनिकेशन डिपार्टमेंट ऑफ पोस्ट हा विभाग पोस्ट संदर्भात सर्व व्यवहार पाहत आहे. पोस्ट खातेचे IPO Act 1898 या अंतर्गत व्यवहार चालत होते. भारत सरकारने या कायद्यात बरेच बदल करुन नवीन The Post Office Act 2024 (Act) हा नवा कायदा अंमलात आणला. यानुसार पोस्ट खात्याच्या बऱ्याच सेवां मध्ये मूलभूत बदल केले आहे. पोस्ट खात्याच्या नवीन Act नुसार पाक्षिक व मासिके यांना जी अंक पोस्ट करण्याची सवलत दिली जात होती ती सर्व सवलती बंद करण्यात आली आहे व त्या जागी मासिक पोस्ट करण्याकरिता ''मॅगझिन पोस्ट'' सेवा सुरु केली आहे.

''मॅगझिन पोस्ट'' सेवेत पोस्ट खात्याने जसे आपण रजिस्टर पोस्ट केल्या नंतर त्याचे ट्रॅकिंग करता येत होते, तसेच ही सुविधा ''मॅगझिन पोस्ट'' मध्ये दिली आहे. जास्तीत जास्त ४ दिवसांत ग्राहकांना १००% मासिक मिळण्याची गॅरंटी दिली आहे. मॅगझिन पोस्ट सेवेसाठी खर्चातील मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. म्हणून जैन जागृति मासिकाचे वर्गणीचे दर जून २०२५ पासून वाढ करण्यात आली आहे.

**जैन जागृति – ''मॅगझिन पोस्ट'' सुविधेसह**
**वर्गणीचे दर (महाराष्ट्र साठी)**

**✼ वार्षिक वर्गणी – रु. ८००**
**✼ त्रिवार्षिक वर्गणी – रु. २३००**

**जाहिरातदारांचे सहकार्य**

जैन जागृति गेली ५६ वर्षे मासिक प्रकाशन द्वारे समाजाची जी अनमोल सेवा करीत आहे, त्याला आमच्या जाहिरातदारांचे मोलाचे सहकार्य मिळत आहे. जैन जागृतित प्रकाशित होणारे चांगले व वाचनीय साहित्य, नियमितपणा, संप्रदाय सद्भाव, संपूर्ण भारतात प्रचंड वर्गणीदार व जाहिरातीचे माफक दर या जैन जागृतिच्या वैशिष्ट्यांमुळेच जैन जागृति मासिकाला शहर, तालुका, अगदी लहान गावातील समाज बांधवांनी जाहिरातीचे सहकार्य दिले आहे.

जास्तीत जास्त शहरे, तालुका, लहान गावातील जैन समाजापर्यंत पोहचण्यासाठी जैन जागृति सर्वात उत्तम माध्यम आहे.

**काही व्यापारी, उद्योजक, समाज बांधव अनेक वर्ष सातत्याने जैन जागृति मासिकात स्वत: होवून जाहिरात देत आहेत. जाहिरातदारांच्या सहकार्या मुळेच जैन जागृति मासिक दरमहा नियमित प्रकाशित होत आहे व त्यामुळे मासिकाद्वारे धर्म जागृति, समाज जागृतिचे कार्य गत ५६ वर्ष सातत्याने होत आहेत**


**सर्व जाहिरातदारांचे खुप खुप आभार, धन्यवाद !**

**वीतरागवाणी, गुरुवाणी जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहाचवण्याचे ''भाग्य'' चोरडिया परिवाराला मिळाले. आम्ही फार भाग्यवान आहोत.**


या प्रदीर्घ कालखंडात काळानुसार आम्ही बदललो. वाचकांशी आमचे असलेले नाते अधिकाधिक दृढ झाले. हजारो वाचक आणि समाज बांधवाच्या आपुलकीच्या भावना यामुळेच आमची पुढील वाटचाल अधिक सुखकर होणार आहे.

**गत वर्षात जैन जागृति मासिकाद्वारे कळत नकळत कोणाची मने दुखावली असल्यास जैन जागृति, चोरडिया परिवार आपली हार्दिक क्षमायाचना मागत आहे.** ●

**।। मिच्छामि दुक्कडम् ।।**



## जैन जागृति, चोरडिया परिवार – सन्मान वर्धमान सांस्कृतिक केंद्र, पुणे



उपाध्याय प. पू. श्री. प्रवीणऋषिजी म. सा. यांच्या पावन निश्रेत श्री आदिनाथ संघ द्वारा वर्धमान सांस्कृतिक केंद्र पुणे येथे जैन जागृति मासिकाचा विशेष सन्मान करण्यात आला.

गत ५७ वर्षापासून अखंडपणे जैन जागृति मासिक जैन समाजाची सेवा करीत आहे. आपल्या मासिकात धार्मिक, सामाजिक, सुसंस्कार व सदाचाराला प्रोत्साहन देणारे लेख व विविध बातम्या प्रकाशित करून जैन धर्माची प्रभावना करत आहे.

या विशेष कार्य बदल जैन जागृतिचे संपादक श्री. संजयजी कांतीलालजी चोरडिया व सौ. सुनंदाजी चोरडिया यांचा सन्मान करण्यात आला. ●


## जैन जागृति, चोरडिया परिवार – सन्मान बिबवेवाडी जैन स्थानक, पुणे




युवा तपस्वी प. पू. श्री. मुकेशमुनिजी म. सा. ठाणा ५ यांच्या पावन निश्रेत श्री बिबवेवाडी जैन स्थानक संघ यांनी जैन जागृति मासिकाचा विशेष सन्मान केला.

जैन जागृति मासिक प्रकाशनाद्वारे गत ५७ वर्षापासून जैन धर्म प्रभावना व जैन समाजाच्या सेवेची अखंड परंपरा चालवत आहे. अनेक वाचनीय लेख व सर्व संप्रदायाच्या बातम्या यात प्रसिद्ध होत असतात.

या विशेष कार्याबद्दल बिबवेवाडी संघाचे अध्यक्ष श्री. पोपटलालजी ओस्तवाल यांच्या हस्ते संपादक श्री. संजयजी कांतिलालजी चोरडिया व सौ. सुनंदाजी चोरडिया यांचा सन्मान करण्यात आला. ●



## छोटी सी बातें

**भारत गौरव**
**आचार्य पुलक सागर**

**❊ 'हार' और 'जीत' इन्सान की सोच पर निर्भर करती है मान लो तो 'हार' और ठान लो तो 'जीत'।**

**❊ दुश्मन की पीठ पीछे बुराईयाँ करके दुश्मनी बढ़ाने के बजाय,**
**हम दुश्मन की पीठ पीछे प्रशंसा कर उसे दोस्ती को मजबूर क्यों नहीं करते।**

# जैन समाजाने ''आंदोलन'' करतांना सर्व बाजूने विचार करावा.

गत ३-४ महिन्यात जैन समाजाने आपल्या मागण्यासाठी, अन्याय झाला यासाठी विविध आंदोलन, सरकारला निवेदन देणे, न्यायालयात याचिका दाखल करणे इ. गोष्ट केल्या.

१६ एप्रिल रोजी विलेपार्ले मुंबई येथील जैन मंदिर पाडण्याबद्दल महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी निषेधासाठी धरणे आंदोलन, कलेक्टरला निवेदन देण्यात आले. विविध वर्तमान पत्रे व टीव्ही वर या संदर्भात बातम्या आल्या. न्यायालयात हे मंदिर अनाधिकृतपणे बांधण्यात आले व मंदिर पाडण्याचा खर्च जैन समाजाकडून घ्यावा असे आदेश दिले.

मुंबई दादर येथील कबूतर खाण्या बद्दल ही जैन समाजाने आंदोलन केले. यावेळी जैन मुनि यांनी केलेले भडकावू भाषण व कबूतर खान्यातील जाळी काढण्यासाठी जैन महिला व पुरुषांनी केलेला आंदोलन हे आपण टिव्हीवर व वर्तमान पत्रात अनेक दिवस पाहत होतो. न्यायालयाने सांगितले माणसाचं जीव महत्त्वाचा, आरोग्याचा दृष्टीने कबूतर खान्यावर बंदी आणली. या आंदोलनात अनेक उलट सूलट प्रश्न विचारून जैन समाजाला बदनाम करण्यात आले.

पर्युषण पर्वात ८ दिवस कत्तलखाणे बंद ठेवावेत यासाठी एका जैन व्यक्तीने कोर्टामध्ये दाद मागितली. अकबर काळात पर्युषण पर्वात ८ दिवस कत्तलखाने बंद ठेवण्याचे फर्मान काढत होते. त्याचा आधार घेवून आता ८ दिवस बंद ठेवावे असे सांगितले. ही गोष्ट न्यायालयाने फेटाळली.

तेलंगणा मध्ये एका श्रीमंत जैन व्यक्तीने कार पार्कींग वरून भांडण केले. तेथील स्थानिक लोकांना मारहाण केली. बहुजन समाजाचा राग उफाळून आला व ''मारवाडी, जैन गो बॅक तेलंगणा''चा नारा सुरु झाला. ही समाजात फार मोठी धोक्याची घंटा आहे.

या घटनामध्ये समाज बांधवांनी वास्तविकते कडे दुर्लक्ष करून काही लोकांच्या हट्टापायी, अपुऱ्या माहितीला बळी पडून आंदोलनही केले. काही गुरुभगवंत व व्यक्ती हे भडकावू भाषण करून लोकांना भडकवतात. अशा घटनांनी सर्व समाज वेटीस धरले जात आहे. या सर्व घटनेत न्यायालयाने जैन समाजाच्या चुकीच्या मागण्याचे विरोध करून त्या अमान्य केल्या आहेत.

जैन समाज हा अल्पसंख्य समाज आहे. कोणतेही आंदोलन करताना त्या घटनेबद्दल, गोष्टीबद्दल संपूर्ण माहिती गोळा करूनच बहुजन जनतेवर अन्याय होणार नाही याचा विचार करून, समाजातील प्रतिष्ठित व अभ्यासू समाजातील नेते, मोठे वकील, ज्येष्ठ गुरुभगवंत यांच्याशी विचार विनमय करून असे अंदोलन किंवा कोर्टात दाद मागावी. आपल्या आंदोलनामुळे जैन समाज हा बहुजन समाजाचा रोषास पात्र होणार नाही याकडे लक्ष द्यावे. ''अनेकांतवाद'' सर्व बाजूंनी विचार करून जैन समाजाने, आंदोलन करावे.

परिवर्तन ही जिवंत माणसाचे, समाजाचे लक्षण आहे. काळानुसार, परिस्थिती नुसार कायदे, नियम बदलत असतात. त्यांचा सर्वांनी आदर केला पाहिजेत आमची अशी परंपरा आहे याचा हट्ट करू नये.

अल्पसंख्य जैन समाजाने मर्यादेत राहून, आपल्या संपत्तीचे प्रदर्शन थांबवले पाहिजेत. आपले घरातील शुभकार्य, लग्न समारंभ, धार्मिक उत्सव यावेळी रस्त्यावर होणारे प्रदर्शन कमी करणे काळाची मागणी आहे.

मोबाईल मुळे सर्वांच्या हातात कॅमेरे आले आहेत. जागोजागी सी. सी. टिव्ही कॅमेरे बसवले आहेत. कोणत्याही घटना प्रसंगाचे चारी बाजूने चित्रण होत आहे. काही सेकंदात या गोष्टी सर्वत्र व्हायरल होत आहे. अशा वेळी गुरुभगवंत, समाजाने, व्यक्तींनी जास्त जागरूक राहणे गरजेचे आहे.

**- संपादक** ●

## कव्हर तपशील - सप्टेंबर २०२५




❖ **जैन जागृति, चोरडिया परिवार – सन्मान**

युवा तपस्वी श्री प.पू. श्री मुकेशमुनिजी म.सा. ठाणा ५ यांच्या पावन निश्रेत श्री बिबवेवाडी जैन स्थानक संघ, पुणे येथे अध्यक्ष श्री. पोपटलालजी ओस्तवाल यांच्या हस्ते जैन जागृतिचे – संपादक श्री. संजयजी कांतीलाल चोरडिया व सौ. सुनंदाजी चोरडिया यांचा सन्मान करण्यात आला. (बातमी पान नं. २६)

❖ **''उवसग्गहरं स्तोत्र'' सामुहिक जाप, पुणे**

श्री बिबवेवाडी जैन संघ, श्री. रसिकलालजी एम. धारिवाल स्थानक, पुणे येथे १७ ऑगस्ट रोजी भव्य ''उवसग्गहरं'' स्तोत्राचा सामुहिक जाप करण्यात आला. (बातमी पान नं. २०५)

❖ **सुहाना फिरती विज्ञान प्रयोग शाळा**

प्रवीण मसालेवाले ट्रस्ट तर्फे सुहाना फिरती विज्ञान प्रयोग शाळा हस्तांतर सोहळा डॉ. अरुणकुमार सिन्हा यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी प्रवीण मसालेवाले उद्योग समुहाचे अध्यक्ष श्री. राजकुमारजी चोरडिया, श्री. प्रदीपजी चोरडिया, श्री. विशालजी चोरडिया इ. मान्यवर उपस्थित होते. (बातमी पान नं. २११)

❖ **नीलकंठ ज्वेलर्स, पुणे**

पुणे येथील नीलकंठ ज्वेलर्सला दागिन्याच्या क्षेत्रातील प्रसिद्ध रिटेल ज्वेलर्स इंडिया ॲवॉर्डस् २०२५ ने गौरविण्यात आले.
(बातमी पान नं. २०७)

❖ **डॉ. संजय चोरडिया, सुर्यदत्त ग्रुप – पुरस्कार**

सुर्यदत्त एज्युकेशन फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजयजी बी. चोरडिया यांना लंडन येथे झालेल्या लोकमत ग्लोबल इकॉनॉमिक कन्व्हेन्शनमध्ये ''महाराष्ट्र रत्न पुरस्कार'' २०२५ प्रदान करण्यात आला. (बातमी पान नं. २१७)

❖ **श्री. राहुलजी चंद्रकांतजी छाजेड – पुरस्कार**

चाकण पुणे येथील राहुल इंजिनिअरींग ग्लोबल प्रा.लि.चे संचालक श्री. राहुलजी चंद्रकांतजी छाजेड व सौ. राखी छाजेड यांना लंडन येथे झालेल्या लोकमत ग्लोबल इकॉनॉमिक कन्व्हेशनमध्ये ''महाराष्ट्र रत्न पुरस्कार'' २०२५ प्रदान करण्यात आला. (बातमी पान नं. २१९) •




**जैन जागृति**

**जीवन साथी**

***दोन जीवाच्या मिलनाचा मंगल मार्ग.***

***आजच आपल्या परिवारातील मुला-मुलींची वधू-वर निवडण्यासाठी जैन जागृति मध्ये जाहिरात द्या.***

**हजारो जैन परिवार पर्यंत पोहचा.**